IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# औरंगाबाद जिल्ह्यातील पर्यटन स्थळे व पर्यटनाचा विकास एक भौगोलिक अभ्यास

नाव:दळवे हेमंत भुजंगराव
संशोधक विद्यार्थी, भूगोल विषय
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद.

**सारांश:-**

जागतिक स्तरावर पर्यटनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, पर्यटन हा मानवी आर्थिक क्रियेतील आधुनिक व्यवसाय म्हणून नावारुपाला आला आहे. पर्यटन धोरण, पर्यटनाच्या स्थळी पायाभूत सोयी-सुविधा, पर्यटक वाढीसाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित असल्यामुळे औरंगाबाद जिल्यातील पर्यटनाला उभारी मिळत असून त्यातूनच पर्यटनाचा विकास होत आहे. कारण औरंगाबाद जिल्यात पर्यटनाच्या असंख्य संधी आहेत. जिल्ह्यात अजिंठा-वेरुळ या जागतिक पर्यटन स्थळाबरोबरच औरंगाबाद लेणी, बीबी- का- मकबरा, खुलताबाद, दौलताबाद, पितळखोरा, घृष्णेश्वर मंदिर, पैठण व हैसमाळ आदि ऐतिहासीक, धार्मिक, सास्कृतिक व नैसर्गिक पर्यटन स्थळे देशी, विदेशी व स्थानिक पर्यटकांना आकर्षित करत आहेत, तसेच जिल्हा रस्ते, रेल्वे आणि हवाई मार्गाने देशाशी जोडला आहे, जिल्ह्यात पर्यटकांना राहण्यासाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व स्थानिक पातळीवर निवास, भोजन व्यवस्था उपलब्ध करून दिल्यामुळे दिवसेन दिवस पर्यटकांच्यासंख्येत वाढ होत आहे. म्हणून प्रस्तुत शोधन निबंधात औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा, वेरुळ, देवगिरी किल्ला व बीबी का मकबरा या चार निवडक पर्यटन स्थळांचे वर्गीकरण, महत्व व त्यांच्या विकासावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

**बीज संज्ञा –** पर्यटन स्थळे, सोयी-सुविधा, पर्यटन विकास

- **प्रास्ताविक**

पर्यटन हा जागतिक स्तरावरील आर्थिक व्यवसाय असून, तो संपूर्ण जगभर कमी-अधिक प्रमाणात विकसित झाला आहे. जगातील प्राकृतिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक व आर्थिक घटकांच्या भौगोलिक वितरणात भिन्नतेमुळे निर्माण झालेली विविधता ही पर्यटनाची मुळ प्रेरणा आहे. या विविधतेचा दृश्य स्वरुपात आस्वाद घेण्यासाठी पर्यटक जगभर भटकत असतात. पर्यटन हा जगातील सर्वात मोठा उद्योग म्हणून ओळखला जातो. (तनेजा, २००६) भारतासारख्या विकसनशील देशाच्या दृष्टीने या उद्योगाला विशेष महत्त्व आहे, (घारपुरे, २००१) स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर एक आशादायक उद्योग म्हणून पर्यटनाला उज्वल भविष्य आहे. पर्यटन हे आर्थिक वाढीचे प्रमुख इंजन आणि परकीय चलनाचा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे. पर्यटन केंद्रांच्या विकासात भौतिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक घटक तसेच पायाभूत सुविधा महत्त्वाची भूमिका बजावतात (अष्टुरे, २०१८)

भारताचा समृद्ध इतिहास आणि सांस्कृतिक व भौगोलिक विविधता यामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटक मोठ्या प्रमाणात आकर्षित होतात. भारतातील. महाराष्ट्र राज्य हे पर्यटकासाठी विविध प्रकारची पर्यटन स्थळे असलेल्या जगातील मोजक्या प्रदेशापैकी एक आहे. कारण या राज्यात जागतिक दर्जाचे प्राचीन किल्ले, स्मारके, लेण्या, प्राचीन गुफा, मंदिरे व यात्रा स्थळे उपलब्ध आहेत. त्यात औरंगाबाद जिल्हयालाही स्वतःची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. पौराणिक मंदिरे अजिंठा वेरुळ, पितळखोरा व इतर स्थळांबरोबर विकसित असलेल्या या जिल्हयास महाराष्ट्र राज्याची पर्यटन राजधानी म्हणून ओळख आहे.

- **अभ्यास क्षेत्र**

औरंगाबाद जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या उत्तर मध्य भागात स्थिर आहे. हा जिल्हा १९°१८' ते २०°४०' उत्तर अक्षांश आणि ७४°३४' ते ७६°०४' पूर्व रेखांश दरम्यान विस्तारलेला असून जिल्ह्याच्या उत्तरेस जळगाव, पूर्वेस जालना, दक्षिणेला बीड, पश्चिमेस नाशिक व नैऋत्येस अहमदनगर जिल्ह्याची सीमा लागली आहे. हा जिल्हा औरंगाबाद, कन्नड, सिल्लोड, सोयगाव, फुलंब्री, पैठण, खुलताबाद, वैजापूर व गंगापूर या नऊ तालुक्यांत विभागला आहे. जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ १०१३७.६१ चौ. कि.मी. इतके आहे. २०११ जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३७०१२८२ इतकी असून, ती जिल्हयातील एकूण १३५६ गावात विस्तारलेली आहे.

**औरंगाबाद जिल्हा: स्थान व विस्तार नकाशा क्र. १**



- **शोध निबंधाची उद्दिष्टये**

१) अभ्यास क्षेत्रातील पर्यटनाच्या सोयी-सुविधा निहाय झालेला विकास अभ्यासणे.

२) जिल्ह्यातील पर्यटन स्थळांना भेटी देणाऱ्या पर्यटकांचा आढावा घेणे.

- **संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध निबंध दुय्यम साधणावर अवलंबून असून, यात विषयाशी संबंधित पुस्तके, प्रकाशित शोध निबंध, मासिके, शासकीय अहवाल, जनगणना अहवाल (२०११), सामाजिक आर्थिक घोषवारा इत्यादी साधणे तसेच भौगोलिक तंत्रामध्ये नकाशे, आलेख जी. पी. एस. संगणक सॉफ्टवेअर आणि पर्यटन केंद्रातील संकलित आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यि- कीय पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

- **शोध निबंधाची मर्यादा**

प्रस्तूत शोध निबंध हा औरंगाबाद जिल्हयापुरते मर्यादित असून यात जिल्ह्यातील अजिंठा, वेरूळ, देवगिरी किल्ला व बीबी-का-मकबरा या चार निवडक पर्यटन स्थळांच्या मुख्य अभ्यासाचे विश्लेषण आणि त्यांच्या विकासाचा समावेश आहे. यासाठी २०१९-२० ते २०२२-२३ जून ही कालमर्यादा आहे.

- **पूर्व संशोधन साहित्य**

**१) लिंकन झकेरिया (२०१३)**

यांनी त्यांच्या लेखात बांग्लादेशातील पर्यटनाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रभावाचे विश्लेषण केले, त्यात पर्यटकांची चर्चा, त्यांच्या भेटीचे उद्देश, आर्थिक योगदान, वाढ व रोजगारांच्या संधी इत्यादीचे विश्लेषण केले आहे.

**२) मुदासीर माजिद मलिक आणि असिमा नुसरत (२०१४)**

यांनी आपल्या 'भारतातील पर्यटन विकासाचा आढावा' या प्रकाशित लेखात १९९७ ते २०१२ या काळात भारतात येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येतील बदल, आर्थिक वाढ आणि पर्यटन विकासाचे विश्लेषण केले आहे.

- **विषयाची मांडणी**

**(अ) औरंगाबाद जिल्ह्यातील पर्यटन स्थळे**


महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्याला प्राचीन ऐतिहासिक व धार्मिक परंपरा लाभली असल्यामुळे जिल्हयात किल्ले, स्मारके, बौद्ध, हिंदू, जैन, मुस्लिम व वारकरी संप्रदायांची अशी अनेक पर्यटन स्थळे उपलब्ध आहेत. त्यापैकी निवडक पर्यटन स्थळांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे दिलेले आहे.

**औरंगाबाद जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचे वर्गीकरण**

| जिल्हा | निवडक स्थळे |
|---|---|
| औरंगाबाद | अजिंठा |
| | वेरूळ |
| | देवगिरी किल्ला |
| | बीबी का मकबरा |

स्रोत: संशोधकाने संकलित केले

औरंगाबाद जिल्हा: निवडक पर्यटन स्थळे नकाशा क्र.२




## १. अजिंठा

अभ्यास क्षेत्रात औरंगाबाद शहरापासून १०२ कि.मी. अंतरावर हे जगप्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. येथे २९ लेण्या असून इ.स. १८१९ मध्ये एका ब्रिटिश अधिका-याने या लेण्यांचा शोध लावला होता. या लेण्यांच्या भिंतीवर बुद्धाच्या जीवनातील दृष्ये दर्शविणारी चित्रे कोरलेली आहेत. (चावला, २००४) या लेण्यात प्राचीन भारतातील समाज जीवनाचे दर्शन संस्कृती, स्त्रियांची केशरचना, अलंकार, वस्त्र, कौटुंबिक जीवन, राजदरबाराचे दृश्य इत्यादी गोष्टींची सुशोभित जीवंत वाटणारी शिल्पे रंगीत भिंतीचित्र व कोरीव काम अप्रतिम असल्याने या लेण्या पाहण्यासाठी देश-विदेशी पर्यटक मोठया संख्येने भेरी देतात.

## २. वेरूळ

औरंगाबाद शहरापासून ३० कि.मी. अंतरावर वेरुळ हे पर्यटन स्थळ असून, येथे ३४ लेण्या आहेत. त्यात १२ बौद्ध, १७ हिंदू आणि ०५ जैन या लेण्या डोंगराच्या कडेला कोरल्या असून, लेण्यातील अवाढव्य कैलास मंदिर हे पर्यटकांचे मुख्य आकर्षन आहे. लेण्यात असलेली सभागृह, प्रवेशद्वार, मंडप व तेथील कला, स्थापत्य उत्तम असल्यामुळे ते पाहण्यासाठी देश-विदेशांतून पर्यटक येतात.

## ३. देवगिरी किल्ला

औरंगाबाद शहराच्या पश्चिमेस २० कि.मी. अंतरावर दौलताबाद पर्यटन स्थळ असून, येथे एक भुईकोट किल्ला हिंदू राजा भिल्लम याने ११८७ मध्ये बांधला होता. अल्लाउद्दीन खिलजीने १२९४ मध्ये त्यावर कब्जा केला. पुढे महंगद तुघलकाने दिल्लीहून देवागिरी येथे राजधानी करून त्यास दौलताबाद नाव दिले. हा किल्ला प्रेक्षणीय व औरंगाबाद शहराजवळ असल्याने पर्यटकांच्या सर्व सुविधा येथे उपलब्ध आहेत. म्हणून देश-विदेशी पर्यटक मोठ्या संख्यने येथे येतात.

## ४. बीबी-का-मकबरा

औरंगाबाद शहराच्या उत्तरेस हा 'मकबरा' ताजमहलची प्रतिकृतीच आहे. यात औरंगजेबाची पत्नी दिलरास-बानू-बेगम (राबिया-उद-दुर्रानी) यांची कबर असून औरंगजेबाच्या काळात तिची निर्मिती झाली आहे; परंतु 'मकबरा' हा मुलगा शहाजादा आजम शाहकडून सन १६५१ ते १६६१ या काळाल आईच्या स्मरणार्थ बांधण्यात आला. कबरीवर दिवसा सूर्य किरणे व रात्री चंद्राचा प्रकाश पडतो. अकबरा स्थापत्य शास्त्रातील अप्रतिम वास्तु असून तिची भवत्या व सौदर्य पाहण्यासाठी स्थानिक व देश-विदेशातून पर्यटक येतात.

## पर्यटन स्थळांचे महत्त्व

अभ्यास क्षेत्रातील निवडलेली पर्यटन स्थळे ही ऐतिहासिक व आर्थिक दृष्ट्या महत्त्वाची आहेत. पर्यटन स्थळाच्या प्रकारासाठी सरकार व खाजगी सहभाग आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करत आहेत. या सेवा-सुविधातून आर्थिक व स्थानिक विकास होत आहे. म्हणून पर्यटन स्थळांना महत्त्व आहे.

## अभ्यास क्षेत्रातील पर्यटनाचा विकास

पर्यटनाचा विकास करण्यासाठी पायाभूत सुविधा या महत्वाच्या मानल्या जातात. जिल्हयातील निवडक पर्यटन स्थळातील प्रवास आणि निवास व्यवस्थेच्या काही सेवा-सुविधा पुढील प्रमाणे दिल्या आहेत.

**पर्यटन स्थळातील उपलब्ध सेवा-सुविधा**

| अ. क्र. | निवडक पर्यटन स्थळे | औरंगाबाद शहरापासून अंतर | उपलब्ध सेवा प्रवासाची साधने | सुविधा निवास व्यवस्था |
|---|---|---|---|---|
| १ | अजिंठा | १०२ | शासकीय बस, विमान, खाजगी वाहने | एम.टी.डी.सी. हॉटेल, शासकीय विश्रामगृहे, धर्मशाळा, स्थानिक हॉटेल |
| २ | वेरूळ | ३० | शासकीय बस, विमान, रेल्वे, खाजगी वाहने | विश्रामगृहे, धर्मशाळा |
| ३ | देवगिरी किल्ला | २० | रेल्वे, बस, विमान | शासकीय विश्रामगृहे, इतर |
| ४ | बीबी का मकबरा | - | ऑटो, खाजगी वाहने | एम.टी.डी.सी. हॉटेल, रामा इंटर न्याशनाल हॉटेल, अन्य शहरातील हॉटेल्स. |

स्त्रोत: संशोधकाने संकलित केले.

वरील तक्त्यावरून जिल्हयातील निवडक पर्यटन स्थळात उत्तम प्रकारच्या वाहतूक व दळणवळन, हॉटेल्स, भोजन, निवास व्यवस्था उपलब्ध असल्यामुळे पर्यटनाचा विकास होत आहे.


## २. पर्यटन स्थळांना भेटी दिलेले पर्यटक (२०१९-२० ते २०२२-२३)

जिल्हयातील निवडक पर्यटन स्थळांना देश-विदेशी पर्यटकांचे झालेले आगमन पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**निवडक पर्यटन स्थळांना भेटी दिलेले पर्यटक**

| वर्ष | अजिंठा | | वेरूळ | | देवगिरी किल्ला | | बीबी का मकबरा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कालावधी | भारतीय | विदेशी | भारतीय | विदेशी | भारतीय | विदेशी | भारतीय | विदेशी |
| २०१९-२० | २७३३४४ | १५८९८ | १२५५८६५ | २१४०७ | ४६५१६८ | ४१७३ | ११९३४५२ | ९५४० |
| २०२०-२१ | ४०१८७ | ५५ | १२०२८३ | ८३ | ९३३९० | ४७ | १८०१४८ | ४८ |
| २०२१-२२ | ११४९१७ | ४०९ | ३४८३४९ | ६०५ | १७९५१२ | १६६ | ३४६५७८ | ३३७ |
| २०२२-२३ | ३९३९२८ | ३९३७ | १४१५८२८ | १०७४४ | ९८३८११ | ४१२३ | ११६१८०२ | ४७१४ |

स्त्रोत: दैनिक लोकमत २८ ऑगस्ट २०२३




वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, औरंगाबाद जिल्ह्यातील निवडक पर्यटन स्थळांना भेटी दिलेल्या पर्यटकांच्या संख्येत २०१९-२० ते मार्च २०२३ पर्यंत वाढ झालेली दिसून येते. सन २०१९-२० मध्ये अंजिठा पर्यटन स्थळाला भेटी दिलेले २७३३४४ भारतीय पर्यटक होते. २०२२-२३ मध्ये त्यात वाढ होऊन ३९३९२८ पर्यटकांनी भेटी दिल्या. तर विदेशी पर्यटक २०१९-२० मध्ये १५८९८, २०२०-२१ मध्ये मध्ये ५५, २०२१-२२ मध्ये ४०९ तर २०२२-२३ मार्च पर्यंत ६९६७ असे वर्ष निहाय कमी-अधिक प्रमाणात विदेशी पर्यटकांनी देखील भेटी दिल्याचे दिसून येते.

वेरूळला सन २०१९-२० मध्ये १२,५५८६५ भारतीय पर्यटकांनी भेटी दिल्या होत्या. २०२०-२१ मध्ये १२०,२८३, २०२१-२२ मध्ये, ३४८३४९ तर २०२२-२३ मध्ये १४१५८२८ असे भारतीय पर्यटकांची वर्ष निहाय वाढ झाली, तर विदेशी पर्यटकांची संख्या वाढलेली दिसून येते.

देवगिरी किल्ला (दौलताबाद) या पर्यटन स्थळाला २०१९-२० मध्ये ४६५१६८ भारतीय पर्यटकांनी भेटी दिल्या आहेत, २०२२-२३ मध्ये त्यात वाढ होऊन ती ९,८३,८११ इतकी झाली तर विदेशी पर्यटकांची संख्या ही २०१९-२० ते २०२२-२३ या कालावधित स्थिर राहिलेली दिसते.

बीबी-का-मकबरा या पर्यटन स्थळाला २०१९-२० ते २०२२-२३ या काळात भारतीय पर्यटकांनी सर्वाधिक पसंती दिली तर विदेशी पर्यटकांचे प्रमाण हे २०१९-२० च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये कमी झालेले दिसते.

**निष्कर्ष : –**

१) अभ्यास क्षेत्रातील निवडक पर्यटन स्थळाला ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक महत्व प्राप्त झाले आहे.

२) या पर्यटन स्थळातील अनेक घटक आकर्षित करतात. त्यात प्राचीन संस्कृती राजदरबाराचे दृश्य, रंगीत शिल्पे, भिंती चित्रे, मंडप, प्रवेशद्वार व तेथील कला व स्थापत्य इ. समावेश असलेला दिसतो.

३) अभ्यास क्षेत्रातील पर्यटन स्थळांसाठी अनेक प्रकारच्या सेवा-सुविधा उपलब्ध आहेत. उदा. वाहतूक, निवास, भोजन व्यवस्था इत्यादी.

४) पर्यटन विकासात पायाभूत सुविधा उपयुक्त ठरत आहेत.

५) उपलब्ध सोयी-सुविधामुळे अभ्यास क्षेत्रातील पर्यटन स्थळाकडे पर्यटकांचे प्रमाण वाढले आहे.

**संदर्भग्रंथ सूची:-**


1. Taneja Ranjit, (2006), 'Travel Geography', Alfa Publication, New Delhi, P. 195.
2. Ashture S.B. (2018), 'Satisfaction Index: A Study in Tautism Geography, Aarushi International Inter-disciplinary Research journal (AIIRJ) Vol-V- Issue-X, P. 18
3. Malik Mudasir Majid and Nusrath Asima (2014) : A Review of Tourism Development in India, Golden Research Thoughts, Vol-3, Issue - 11, P. 01
4. महाराष्ट्र शासन (२०२१), जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, औरंगाबाद जिल्हा, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, औरंगाबाद पृ. ११-२०
5. Census of India (२०११) District Census Hand book, Aurangabad District Series-25, part XII B, P-10
6. Lincoln Zakaria (2013) Socio-Economic and cultural Impacts of Tourism in Bangladesh, European scientific journal Vol.2 Issue-X P-10
7. Chawla Romila (2004), Heritage Tourism and Development, Sonali Publication, New Delhi, B-276
8. Censusindia.gov.in
9. Mahadies.maharashtra.gov.in